# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस.के.बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२८

दुरध्वनी : ०२२-२४२२४४३८ | २४२२१५५८

ईमेल : admin@siddhivinayak.org । info@siddhivinayak.org

वेब : www.siddhivinayak.org

श्रीसिध्दिविनायक

दि. १९.०६.२०२५

## पुर्नदरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : मंदिरात येणाऱ्या भाविकांना ड्रेसकोड च्या अनुषंगाने वस्त्र पुरवठा करण्याबाबत**

**कालावधी**

**जूलै २०२५ ते मार्च २०२६**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात येणाऱ्या भाविकांना ड्रेसकोड च्या अनुषंगाने वस्त्र पुरवठा करण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वर्षभरासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : | गुरूवार, दि. १९ जून २०२५ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | गुरूवार, दि. २६ जून २०२५ सायं ५.०० वा |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | शनिवार, दि. २८ जून २०२५ |

अटी व शर्ती :

१) मूळ दरत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification) मंदिरात येणाऱ्या भाविकांना ड्रेसकोड च्या अनुषंगाने वस्त्र परिधान करण्याकरिता लागणारे वस्त्र खरेदी करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) आपण करीत असलेल्या कामाचा दर्जा उत्तम असावा तसेच ३ वर्षाचा अनुभव असल्याबाबतची कागदपत्रे (देयके, कार्यादेश, पुरवठा आदेश ई ) सादर करावी.

३) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून ५० किमी अंतरावर असणे आवश्यक आहे.

४) मंदिरात येणाऱ्या भाविकांना ड्रेसकोडच्या अनुषंगाने वस्त्र परिधान करण्याकरिता लागणारे वस्त्र न्यासाच्या खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करावयाचे आहे. साहित्यांच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

५) सदर साहित्याचे कार्यादेश प्राप्त झाल्यापासून ५ दिवसात पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील. पुरवठयाचे काम पुर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलात पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बॅकेचा तपशील नमूद करणे.

६) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे :

अ) कंपनी नोंदणीचा दाखला

ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी / ट्रेडिंग लायसन्स

क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

ड) ३ वर्षाचा अनुभव असल्याबाबतची कागदपत्रे (देयके, कार्यादेश, पुरवठा आदेश ईत्यादी प्रती)

७) दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्विकृत दर अखेर पर्यंत कायम राहतील कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

८) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

९) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१०) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

११) मंदिरात येणाऱ्या भाविकांना ड्रेसकोड च्या अनुषंगाने वस्त्र परिधान करण्याकरिता लागणारे वस्त्र संबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९१११६० वर संपर्क साधावा.

१२) दरपत्रकधारकाने लिफाफा देताना तांत्रिक व मुल्य असे दोन लिफाफे व त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

१३) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

(संदीप राठोड)
उप कार्यकारी अधिकारी

# मूळ दरपत्रक

दरपत्रकामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

दरपत्रकधारकाचे नाव : ----------------------------------------------------------------

दरपत्रकधारकाचा कायमचा पत्ता : -----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

दरपत्रकधारकाचा नोंदणी क्रमांक : -----------------------------------------------------------

जी एस टी क्रमांक : ---------------------------------------------------------------------

## BOQ

( ड्रेसकोड (अंगभर कपडे) वस्त्राबाबतचा तपशिल )

| अ.क्र. | तपशिल | कोड नंबर | वर्षभरासाठी अंदाजे लागणारी वस्त्र | दर प्रति नग (सर्व कर वगळून) | अंदाजे होणारी वस्त्राची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॉटन सुर्या लुंगी (लाल) २.२५ मी. | ५४०७ | १००० | | |
| २ | कॉटन शेला (लाल) १.८० मी. | ५४०७ | १००० | | |
| ३ | कॉटन शाल (लाल) | ५४०७ | १००० | | |